**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८.**

**वृक्षप्राधिकरण**

**जाहीर नोटीस**

महाराष्ट्र ( नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ चे कलम ८-३ अन्वये जाहिर नोटीस देणेत येते की, पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील वृक्ष, काढणे/पुनर्रोपण करणे, बांधकामास अडथळा ठरणारे/वठलेले वृक्ष/धोकादायक वृक्ष/ रस्ता विकसनाच्या कामास/ प्रकल्पांच्या कामास अडथळा करणारे वृक्ष पूर्ण काढणे/पुनर्रोपण करणेस, परवानगी देण्याबाबतचे प्रस्ताव उप आयुक्त तथा वृक्ष अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचेमार्फत पाहणीचा अहवाल मा. अध्यक्ष तथा महापालिका आयुक्त, वृक्षप्राधिकरण, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्यासमोर मान्यतेसाठी सादर करणेत येणार आहे. पूर्वीची दिनांक ०७/०८/२०२४ रोजी होणारी मा. वृक्षप्राधिकरण सभा काही कारणास्तव पुढे ढकलण्यात आली असून सदरहू प्रस्तावांची तपशीलवार सविस्तर माहिती पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळांवर सर्वसाधारण माहिती या लिंकवर डाऊनलोड करता येईल.

सदरहू प्रस्तावांमधील वृक्षांसंबंधी कोणाचेही आक्षेप असल्यास त्यासंदर्भात योग्य कारण व वस्तुस्थितीदर्शक पुराव्यासह लेखी हरकत अर्ज अथवा तक्रार संबंधित उप आयुक्त तथा वृक्ष अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, कार्यालयाचा पत्ता- यशवंतराव चव्हाण गुलाब पुष्प उदयान, टी ब्लॉक, हॉकी स्टेडीयमजवळ, नेहरूनगर, भोसरी पुणे- ४११०२६ यांचेकडे ही जाहिर नोटीस प्रसिध्द झालेपासून सात दिवसाचे आत नोंदविण्यात याव्यात. मुदतीमध्ये योग्य कारण व वस्तुस्थितीदर्शक पुराव्यासह आक्षेप अर्ज सादर करण्यात यावा. योग्य कारण व वस्तुस्थितीदर्शक पुराव्यासह आक्षेप अर्ज सादर न केल्यास तसेच मुदतीनंतर आलेले आक्षेप अर्ज फेटाळण्यात येतील याची नोंद घेण्यात यावी.

(रविकिरण घोडके)
सदस्य सचिव, वृक्ष प्राधिकरण
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८

जाहिरात क्रमांक.-
क्रमांक- वृक्ष/३अ/कावि/१८५८/२०२४
दिनांक- ०७/०८/२०२४